# पोलीस कल्याण निधीमधुन अनुदान म्हणुन मिळणारे फायदे

१) पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या परंतु पोलीस विभागात सेवेत असतांना मृत पावलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या पत्नी / पतीला / जवळच्या नातलगाला अंत्यविधी करीता खर्च भागविण्यासाठी रुपये १०,०००/- इतक्या रक्कमेचे **अंत्यविधी अनुदान** दिल्या जातो.

२) सेवेत असतांना आपले कर्तव्य बजावत असतांना किंवा अन्यथा मरण पावलेल्या पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाच्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कुटूंबियांना रुपये २०,०००/**- सानुग्रह अनुदान** दिल्या जातो.

# महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेचा फायदा घेण्याकरिता लागणारे कागदपत्रे

१. अधिकारी / कर्मचारी यांचेजवळ म.रा.कुं.आ. योजनेचे कार्ड असणे आवश्यक आहे. सदर कार्ड असल्यानंतरच सदर फायदा मिळेल.
२. सेवेत कार्यरत असतांना अधिकारी / कर्मचारी स्वतः किंवा त्यांचेवर असलेले कुटूंबियातील व्यक्ती आजारी असतील तर मराकुआयोचे कार्ड, ज्या हॉस्पीटलमध्ये भरती आहे त्यांचे आजाराबाबतचे प्रमाणपत्र, कर्मचा-यांचा अर्ज असणे आवश्यक आहे. तसेच आई-वडील जर कर्मचाऱ्यांवर अवलंबून असतील तर त्यांचेबाबतीत आई-वडीलांना पेन्शन, किंवा इतर मार्गाने होणारे उत्पन्न मिळत असेल तर आईवडीलांना सदर योजनेचा फायदा मिळणार नाही.
३. तसेच अधिकारी / कर्मचारी यांनी मपोकुआयो चा उपचार करतांना आई-वडीलांकरिता नाहरकत प्रमाणपत्र मागवितांना अर्जात आई-वडीलांना पेन्शन नाही, त्यांना कोणत्याही प्रकारचे उत्पन्न नाही, ते माझ्यावरच अवलंबून आहे असे नमुद करणे गरजेचे आहे.